# डिसेंबरची डेडलाइन

## मेट्रो ३ मार्गिकेवरील विद्यानगरी, सांताक्रूझ, बीकेसी स्थानकांवर भर



**म. टा. खास प्रतिनिधी**

**मुंबई :** राज्यातील पहिली भूमिगत मेट्रो मार्गिका असलेल्या मेट्रो ३च्या आरे कॉलनी ते बीकेसी या पहिल्या टप्प्यासाठी प्रशासनाने कसोशीने प्रयत्न सुरू केले आहेत. याअंतर्गत विद्यानगरी, सांताक्रूझ व बीकेसी या स्थानकांची उभारणी वेगाने सुरू करण्यावर भर दिला आहे. डिसेंबर २०२३मध्ये हा पहिला टप्पा सुरू करणे अपेक्षित आहे.

मेट्रो ३ ही मार्गिका मुंबईच्या पश्चिम उपनगरांना उत्तर-दक्षिण जोडते. उत्तरेकडे सारिपूतनगर (बीकेसी) ते दक्षिणेकडे कफ परेडपर्यंत ही मार्गिका आहे. मार्गिकेचा पहिला टप्पा आरे ते बीकेसी उत्तर (प्राप्तीकर कार्यालय) असा सुरू होणार आहे. हा पहिला टप्पा डिसेंबरपर्यंत सुरू करण्याचे उद्दीष्ट ही मार्गिका विकसित करणाऱ्या मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेडने (एमएमआरसीएल) समोर ठेवले आहे. त्यासाठी प्रशासनाकडून युद्धपातळीवर तयारी सुरू आहे.

- **पहिला टप्पा पूर्ण होणे अपेक्षित**
- **प्रशासनाकडून युद्धपातळीवर तयारी**
- **रोज कामांचा आढावा**

**मेट्रो ३ टप्पा १मधील स्थानके**
आरे, सीप्झ, एमआयडीसी, मरोळ नाका, आंतरराष्ट्रीय विमानतळ, सहार रोड, देशांतर्गत विमानतळ, सांताक्रूझ, विद्यानगरी, बीकेसी.

या मार्गिकेच्या पहिल्या टप्प्यात आरे कारशेडसह एकूण दहा स्थानकांचा समावेश आहे. ही १२ किलोमीटर लांबीची मार्गिका असेल. सद्यस्थितीत या मार्गिकेतील मरोळ नाका या स्थानकापर्यंतची स्थानके बांधून पूर्ण तयार आहेत. त्यानंतरच्या स्थानकांची उभारणी जोमाने सुरू आहे. मात्र विद्यानगरी, सांताक्रूझ व बीकेसी ही स्थानके महत्त्वाची असतील. ती कामे जोमाने सुरू आहेत. त्यांचाच आढावा घेण्यासाठी कंपनीच्या व्यवस्थापकीय संचालक अश्विनी भिडे या दररोज विस्तृत आढावा घेत आहेत. भिडे यांनी यांनी कंपनीचे संचालक (प्रकल्प) सुबोध गुप्ता यांच्यासह अलिकडेच या तिन्ही स्थानकांना भेट दिली.



कुठल्याही स्थितीत मेट्रो ३ चा पहिला टप्पा डिसेंबरपर्यंत सुरू करायचा आहे. त्यादृष्टीने जोमाने कामे पूर्ण करण्याची सूचना भिडे यांनी यावेळी अधिकाऱ्यांना दिली. डिसेंबरची डेडलाइन गाठण्यासाठी उच्चस्तरावर कामे सुरू असल्याचे भिडे यांनी स्पष्ट केले.